**निशाणी क्र. ४५**
वर पुढे सुरु



**<u>प्रथम पक्षकार क्र. १ तर्फे द्वितीय पक्षकार साक्षीदाराचा शपथेवरील</u>**

**<u>पुढील उलटतपास विधीज्ञ श्री. मोहोळकर यांचेमार्फत सुरू.</u>**

३४. आज रोजी मी ई.एस.आय. व पी. एफ. चे कागदपत्र व पगाराची स्लीप दाखल करण्याकरीता आणलेले नाहीत. साक्षीदार सांगतो की त्याला ई.एस.आय. लागू नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझा पगार डी–लावल कंपनी देत होती व माझा प्रॉव्हीडंट फंड डी–लावल कंपनी कपात करत होती हे दाखविण्याकरीता माझ्या शब्दाशिवाय इतर पुरावा नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला पगार कॉन्ट्रक्टर पाटणकर देत होते व माझा पी. एफ. देखील तेच कपात करत होते.

३५. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. (४), (५), (८) व (९) मधील मजकुर शाबीत करण्याकरीता माझ्या शब्दाशिवाय पुरावा नाही. Tetra Laval, Tetra Pack and Sidel या कंपनीचे बोर्ड ऑफ डायरेक्टर्स कोण आहेत हे मला माहीत नाही. माझ्या शपथपत्रातील परिच्छेद क्र. ४ मधील मजकुर की, Functional integrality and functional independence या शब्दांचा अर्थ मला माहीत नाही. Tetra Laval, Tetra Pack and Sidel या कंपन्यांचे कामकाज व परिसर मी पाहिलेला नाही.

३६. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या नेमणूकीपासून नोव्हेंबर २००८ पर्यंत मी कंपनीत २४० दिवस काम केले हे दाखविण्याकरीता मी कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही. साक्षीदार सांगतो की, त्याने जॉबकार्ड दाखल केले आहे.

३७. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या शपथपत्रात मला कामावरून कमी केल्याची तारीख नमूद केलेली नाही. मला कामाावरून कोणी काढले याबाबतचा मजकुर मला देता येत नसल्याने तो शपथपत्रात नमूद करण्यात आलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, डी–लावल कंपनीने मला कधीही तोंडी आदेशान्वये कामावरून कमी केलेले नाही.

३८. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या शपथपत्रातील मजकुर शाबीत करण्याकरीता मी दाखल केलेले जॉब कार्ड व्यतिरिक्त अन्य कागदोपत्री पुरावा

अभिलेखावर नाही. पी. एफ. चा नंबर मी पुढच्या तारखेला सांगू शकेन. मला बोनस मिळत होता. मला पगार व बोनस रोख स्वरूपात मिळत होता. मला माहीत आहे की, कंपनीच्या कर्मचा–यांचे पगार बँकेच्या खात्यात जमा होत होते व रोखीने पगार होत नाही.

३९. मी कंपनीत नोकरी मिळण्याकरीता केलेल्या अर्जाची प्रत दाखल करू शकत नाही. मला आठवत नाही की, कंपनीने मला नेमणूकपत्र दिले होते किंवा नाही. मी सांगू शकत नाही की, मी माझे नेमणूकपत्र दाखल करू शकतो किंवा कसे. मला कामावरून बेकायदेशीररित्या तोंडी आदेशाने कमी केल्याबाबत मी कंपनीकडे तक्रार अर्ज केला होता. त्या अर्जाची प्रत मी दाखल करू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी तक्रार अर्ज दिला होता हे दाखविण्याकरीता माझ्याकडे माझ्या शब्दाशिवाय इतर पुरावा नाही.

४०. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रथम पक्ष क्र. २ कॉन्ट्रॅक्टर पाटणकर यांच्याकडे नोकरीला होतो. हे म्हणणे खरे नाही की, तेच मला पगार देत होते व माझ्या पगारातून पी. एफ. ची रक्कम कपात करत होते.

४१. मला आता दि. १८/०७/२००९ चे पत्र दाखविण्यात आले. हे म्हणणे खरे आहे की, त्यावर माझी सही आहे. त्या पत्रात असे नमूद आहे की मला डिसेंबर २००८ व जानेवारी २००९ मध्ये कामावरून कमी केले. हे म्हणणे खरे नाही की, मला कधीही डी–लावल कंपनीने कामावरून काढून टाकलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कॉन्ट्रक्टर पाटणकर यांचा कर्मचारी होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझे व डी–लावल कंपनीमध्ये कधीही मालक व नोकर संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या कामावर कंपनीचा कोणताही अधिकारी देखरेख करत नव्हता.

४२. नोव्हेंबर २००८ पासून मी नोकरी मिळण्याचा प्रयत्न केला हे दाखविण्याकरीता कागदोपत्री पुरावा दाखल न करण्याचे कारण मी सांगू शकत नाही. मी सध्या शेत मजूरी करतो. मला त्यातून आठवडयाला रू. १००/– ते रू. १५०/– मिळत असतात. मी बेलवडी येथे शेतमजूरीचे काम करतो. मी कंपनीचे कॉन्टॅक्ट लेबर ॲक्ट खालचे रजिस्ट्रेशन आणि कॉन्ट्रक्टरचे लायसन्स् पाहिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया आशयाचे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास – संपला.</u>**

**<u>फेरतपास – काही नाही.</u>**

समक्ष / श्रवणोत्तर स्वीकृत
वा.दा.व.अ.क.के

ठिकाण – सातारा.
दिनांक –२८/११/२०२५

( निखिल अ. गुप्ता )
पिठासीन अधिकारी,
कामगार न्यायालय, सातारा.